भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र




०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ४५५/पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- १८ /०८/२०१८

# विशेष वार्तापत्र

## " अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनीयमान्वये कारवाही "

## पोलीस स्थागुशा व जिल्हा रेड पथकाची कारवाही

**भंडाराः—** दिनांक २४/८/२०१८ रोजी पोलीस अधीक्षक भंडारा श्रीमती विनीता साहू, व अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर यांना मिळालेल्या माहीतीच्या आधारे अक्षय संजय फुलसुंगे यांचे राहते घर हनुमान वार्ड भंडारा येथे अनैतिक व्यापार करतांना तिन महिला व मॅन फोर्स कं. २ कंडोम तसेच नगदी पैसे किमंती ६,५२०/—रू चा माल मिळुन आला. हि कार्यवाही स्थानीक गुन्हे शाखा भंडारा, जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे रेड पथकातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी पार पाडली.

याबाबत माहीती अशी की, दिनांक २४/८/२०१८ चे १६.४५ वाजता दरम्यान भंडारा शहरात किंवा आजुबाजुचे परीसरात २० ते ४० वयोगटातील महिला देहविक्री व्यवसाय करीत असलेल्या माहीती वरुन एका पुरुषाला बोलावुन त्यांचेकडून पैसे घेऊन देह विक्री व्यवसाय करत आहेत. या कार्यवाही करण्याकरीता पोलीस स्टाफ निरीक्षक अरुण गुरनुले, पोउपनि. सचिन गदादे, पोउपनि. जितेन्द्र आडोळे, सफौ.५३९, सफौ. ५४४, पोहवा. १६३, पोना. १५९ , पोना. ४३ , मपोना. ८३५, १०२०, पो. शि. १०९१, २३, १२७२ मपोशि. १२५८, १३४२, ६७९, १४४३ हे गेले असता पोलीस स्टॉप व पंचासह बाजुला असलेला जिना चढुन सदर घरात प्रवेश केला असता घराचे समोरील खोलीत दोन स्त्रिया बसुन मिळाल्या. त्यांना तेथे येण्याचे कारण सांगुन तेथे हजर राहिल्याबाबत विचारणा केली असता दोघींनी उडवा—उडवीची उत्तरे दिली. त्यांना ताब्यात घेऊन आतील रुम मध्ये प्रवेश केला असता आत रुममध्ये इसम नामे हा स्त्री सोबत अर्धनग्न अवस्थेत मिळुन आला, त्यांना पकडून पोलीस अधिक्षक कार्यालयात आणुन त्याची पंचासमक्ष पाहणी केली असता त्याचे जवळ पैसे तसेच इतर साहित्य मिळुन आल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे यांचेविरूध्द अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनीयम, १९५६चे कलम ३,४,५ अन्वये गुन्हयात जप्त करण्यात आला.

"जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे कडुन जिल्हयातील सर्व नागीकांना अवैध धंदे समुळ नष्ट करून गावात शांततेचे व विकासाचे वातावरण निर्माण करण्याकरीता पोलीसांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे."

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.